MHKO100005422013

# निशाणी क्र. ४२ वरील आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज उलटतपास नाहीचा आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचा अर्ज व प्रतिवादी यांनी दाखल केलेले निशाणी क्र. ४३ वरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

३. वादी यांचे असे कथन आहे की, वादीतर्फे साक्षीदाराचा पुरावा देणेसाठी दिनांक ०२/०२/२०२३ रोजी तारीख नेमणत आली होती. तथापी वादी हे नोकरीनिमीत्त बाहेरगावी असलेमुळे रजा न मिळालेने ते प्रस्तुत कामी हजर राहू शकले नाहीत. तसेच दरम्यानच्या काळात वादी नं. १ब याचा विवाह झालेने त्यांना नेमले तारखेस हजर राहता आले नाही. त्यामुळे न्यायालयाने वादी याचा पुरावा बंद केला आहे. वादीस पुरावा देणेस परवानगी दिली नाहीतर वादीचे कधीही व कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सदर आदेश रद्द केल्यास प्रतिवादीचे काहीही नुकसान होणार नाही. तरी पुरावा बंदचा आदेश रद्द करणेची विनंती वादीने केली आहे.

४. प्रतिवादी यांनी निशाणी क्र. ४३ वर सदर अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी असे कथन केले की, वादीने त्यांचा सरतपास दिनांक ०५/०९/२०१८ रोजी दाखल केला आहे. प्रतिवादीने वादीचा उलटतपास पूर्ण केला आहे. त्यानंतर वादीने साक्षीदार संदीप कागवाडे यांना

साक्षीसाठी हजर होणेसाठी दिनांक ०८/११/२०१९ रोजी साक्षी समन्सचा अर्ज दाखल केला आहे. सदरचा अर्ज साक्षी भत्ता भरलेच्या अटीवर न्यायालयाने मंजूर केला आहे. परंतु वादीने आजपर्यंत साक्षीदाराचा भत्ता न्यायालयात भरला नाही. साक्षीदार भत्ता न भरलेबाबत कोणतेही संयुक्तीक कारण अर्जात वादीने नमूद केले नाही. प्रतिवादी यांना न्यायहक्कापासून दूर ठेवणेसाठी व प्रस्तुतचे काम लांबणीवर टाकणेसाठी वादी यांनी जाणुनबुजून टाळाटाळ केली आहे. तरी वादीचा अर्ज नामंजूर व्हावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता वादी यांनी निशाणी क्र. ३१ वर संदीप कागवाडे यांना साक्षीसाठी साक्षी समन्स काढण्याचा अर्ज दिनांक ०८/११/२०१९ रोजी दाखल केला होता. तो मंजूर झाल्यानंतर आजपर्यंत वादीने साक्षी भत्ता भरला नाही म्हणून वादीचा पुरावा बंद करण्यात आला आहे. वादीने त्यांचा पुरावा नोंदविण्यासाठी पुढील स्टेपस् घेतल्या नाहीत त्यामुळे प्रकरण प्रलंबित राहीले व त्यामुळे प्रतिवादीस विलंब सहन करावा लागला. परंतु सदर प्रकरण गुणदोषावर निकाली काढण्यासाठी वादीचा पुरावा अभिलेखावर येणे गरजेचे आहे. त्यानुसार ''पुरावा बंद'' आदेश रद्द करुन व त्यांनी केलेल्या विलंबाबाबत त्यांचेवर खर्च बसवून वादीस पुरावा देणेस परवानगी देणे न्यायोचीत होणार आहे. सबब, वादी यांचा अर्ज प्रतिवादी यांना खर्चादाखल रक्कम देणेच्या अटीवर मंजूर करणेत येतो. त्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश करत आहे.

## आदेश

**१.** अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** वादी यांनी प्रतिवादी यांना रक्कम रुपये ३०००/— (अक्षरी रुपये तीन हजार मात्र) पुढील तारखेपुर्वी अथवा पुढील तारखेदिवशी खर्च देण्याच्या अटीवर तसेच वादी यांनी निशाणी क्र. ३१ वरील आदेशाची पुर्तता करण्याचे अटीवर वादी यांचे विरुध्द झालेला ''पुरावा बंद'' आदेश रद्द करण्यात येतो.

**३** सदरचे प्रकरण हे जुने असलेने वादी यांनी प्रतिवादी यांना उपरोक्त नमुद खर्चाची रक्कम वर नमुद मुदतीत न दिलेस सदरचा आदेश आपोआप रद्द समजणेत यावा.

DHANASHRI MAHADEV PAWAR

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2023.06.15 17:19:40 +0530

ठिकाण — गडहिंग्लज.
दिनांक — १५/०६/२०२३

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज.